# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 07 July 2024

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०७ जूलै २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २२ जुलैपासून
- मराठा समाजाच्या मागण्या मान्य न झाल्यास राजकीय भुमिका घेण्याचा आंदोलक मनोज जरांगे यांचा इशारा
- मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी ३१ ऑगस्टनंतरच्या अर्जांचाही विचार होणार, हिंगोली जिल्ह्यात योजनेसंदर्भात लाचखोर ग्रामसेवकावर गुन्हा दाखल
- जालना जिल्ह्यात भोकरदन इथं अवैध गर्भलिंग निदान प्रकरणी सोनोग्राफी सेंटरवर छापा, बोगस डॉक्टर फरार

आणि

- तुळजापूर–धाराशिव रेल्वे मार्गाच्या कामाला लवकरच सुरुवात होणार – आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

****

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २२ जुलैपासून सुरु होणार आहे. २३ जुलै रोजी २०२४-२५ वर्षासाठीचा अर्थसंकल्प संसदेत मांडण्यात येईल. १२ ऑगस्टपर्यंत हे अधिवेशन चालणार असल्याची माहिती संसदीय कार्यमंत्री किरेन रिजीजू यांनी दिली आहे.

****

नीट यूजी परीक्षेसंदर्भातल्या समुपदेशनाची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही. त्यामुळे माध्यमांमध्ये प्रसारित झालेलं समुपदेशन पुढे ढकलल्याचं वृत्त चुकीचं असल्याचं आरोग्य मंत्रालयाने स्पष्ट केलं आहे.

****

शासकीय योजना आणि अंमलबजावणी संदर्भात काल मुंबईत झालेल्या महायुती पदाधिकाऱ्यांच्या राज्यस्तरीय मेळाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मार्गदर्शन केलं. महायुती सरकारच्या दोन वर्षातल्या कल्याणकारी योजना घराघरात पोहोचवा, येत्या निवडणुकीत महायुतीचाच विजय होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह महायुतीचे इतर नेते यावेळी उपस्थित होते.

****

देशाच्या वाहन उद्योगाची उलाढाल सात लाख कोटीवरून २० लाख कोटीवर पोहचली असून, येत्या काळात ही उलाढाल ५० लाख कोटींवर पोहचवण्याचा प्रयत्न असल्याचं, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. नागपुरात एका कंपनीच्या उद्घाटनप्रसंगी ते काल बोलत होते. राज्यात सेमिकंडक्टरचा प्रकल्प यावा यासाठी काही कंपन्यांसोबत चर्चा सुरू असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमात सांगितलं.

****

मराठा आरक्षणासंदर्भात हैदराबाद गॅझेटमध्ये जर कोणत्याही जिल्ह्याचा उल्लेख असेल तर त्याचा आरक्षणासाठी लाभ होईल, या संदर्भात प्रशासनाकडून माहिती घेतली जात असल्याचं खासदार अशोक चव्हाण यांनी सांगितलं आहे. मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी नांदेड इथं चव्हाण यांची भेट घेतली, त्या पार्श्वभूमीवर ते काल वार्ताहरांशी बोलत होते. मराठवाड्यात सुरू झालेल्या मराठा आरक्षण संवाद यात्रेला कोणाचाही विरोध नसल्याचं त्यांनी सांगितलं.

****

दरम्यान, जरांगे यांच्या नेतृत्वात काल हिंगोली इथं आरक्षण जनजागृती शांतता रॅली काढण्यात आली. मराठा समाजाला सरसकट कुणबी दाखले देण्याच्या मागणीचा त्यांनी पुनरुच्चार केला. मराठा समाजाच्या मागण्या मान्य न झाल्यास राजकीय भुमिका घेण्याचा इशाराही जरांगे यांनी यावेळी दिला. लाखोंच्या संख्येनं मराठा बांधव या रॅलीत सहभागी झाले होते.

****

मुंबईत जोगेश्वरी इथल्या कथित भूखंड घोटाळ्याप्रकरणी शिवसेना खासदार रविंद्र वायकर यांच्याविरोधातला तपास बंद करण्याचा अहवाल मुंबई पोलिसांच्या आर्थिक

गुन्हे शाखेनं दिल्यानंतर, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सरकारवर टीका केली आहे. काल नागपूर इथं वार्ताहरांशी बोलताना त्यांनी, वायकरांना क्लिन चीट देणं म्हणजे भाजप भ्रष्ट नेत्यांना पाठिंबा देत असल्याचा आरोप त्यांनी केला.

****

टाळ-मृदंगाच्या गजरात ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांना काल नीरा नदीत स्नान घालण्यात आले. नीरा स्नानानंतर माऊलींच्या पालखी सोहळ्यानं पुणे जिल्ह्याचा निरोप घेतला. ही पालखी आज सातारा जिल्ह्यातल्या लोणंद मुक्कामी असणार आहे.
संत श्री तुकाराम महाराजांची पालखी आज बारामतीहून पुढे मार्गस्थ होत आहे.
संतश्रेष्ठ नरसी नामदेव आणि गंगाखेड इथल्या संत जनाबाई या गुरु - शिष्यांच्या पालख्यांचं काल बीड जिल्ह्यातल्या अंबाजोगाई शहरात अश्व रिंगण झालं. डोळ्याचं पारणं फेडणारा हा अश्वरिंगण सोहळा बघण्यास भाविकांनी गर्दी केली होती.

****

पंढरपूर इथं अहिल्या भवनसाठी पाच कोटी निधीसह विविध मागण्यांसाठी धनगर समाजाच्या शिष्टमंडळानं काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानभवनात भेट घेऊन त्यांना निवदेन दिलं. मागण्या मान्य न झाल्यास येत्या आषाढी एकादशीला पंढरपूरला पहाटे विठ्ठल मंदिराला शेळ्या-मेंढ्यांसह प्रदक्षिणा घालत आंदोलन करण्याचा इशारा शिष्टमंडळानं दिला आहे.

****

'नीट' परीक्षा गैरव्यवहार प्रकरणात सीबीआयच्या कोठडीत असलेला लातूर इथला संशयित आरोपी संजय जाधव याला आठ जुलैपर्यंत सीबीआय कोठडी, तर दुसरा आरोपी जलिल खान पठाण याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. या दोघांच्या सीबीआय कोठडीची मुदत काल संपल्यानं त्यांना न्यायालयात हजर करण्यात आलं होतं.
दरम्यान, आरोपी संजय जाधव याच्या मोबाईलमधून दिल्लीतल्या गंगाधर नामक आरोपीचा पत्ता सापडल्यामुळे त्याला आंध्रप्रदेश मध्ये अटक केल्याचं सीबीआय अधिकाऱ्यांनी न्यायालयात सांगितलं.

****

मुख्यमंत्री- लाडकी बहीण ही निरंतर चालणारी योजना असून, ३१ ऑगस्टपर्यंत जर कागदपत्रांची पूर्तता करता आली नाही तरी, नंतर येणाऱ्या अर्जांचाही अनुदानासाठी विचार केला जाईल, असं राज्याचे मदत आणि पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी

म्हटलं आहे. ते काल नंदुरबार इथं वार्ताहारंशी बोलत होते. विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडे पूर्ण संख्याबळ असल्यामुळे पक्षाचे दोन्ही उमेदवार निवडून येतील, असा विश्वासही पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

****

हिंगोली जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतल्या लाभार्थी महिलेकडून १०० रुपये लाच घेणार्या ग्रामसेवकावर गुन्हा दाखल झाला आहे. कळमनुरी तालुक्यातल्या डोंगरकडा आणि भाटेगाव इथला ग्रामसेवक मुकुंद घनसावंत हा या योजनेतल्या लाभार्थी महिलांना अर्ज करण्यासाठी रहिवासी प्रमाणपत्रासाठी अनधिकृत रित्या वसुली करत होता. यासंदर्भातला एक व्हिडिओ प्रसारित झाल्यानंतर चौकशी करण्यात आली. चौकशीनंतर कळमनुरी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी लिंबाजी बारगीर यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला.

****

जालना जिल्ह्यात भोकरदन इथं राजपूत सोनोग्राफी सेंटर इथं सुरू असलेल्या अवैध गर्भलिंग निदान आणि गर्भपात केंद्रावर काल पोलिसांनी धडक कारवाई केली. दिलीपसिंग राजपूत असं गर्भलिंग निदान करणाऱ्या डॉक्टरचं नाव असून तो बोगस असल्याचं आढळलं आहे. याप्रकरणी या सेंटरमधल्या तीन कर्मचाऱ्यांना ताब्यात घेण्यात आलं, मात्र डॉक्टर राजपुत हा फरार आहे. पोलिसांसोबत असलेल्या वैद्यकीय पथकानं गर्भपातासाठीचे इंजेक्शन, दोन सोनोग्राफी यंत्र तसंच राज्यभरातल्या संबंधीत मध्यस्तांच्या माहितीच्या नोंदी आणि सुमारे नऊ लाख रुपये रोकड जप्त केली.

****

सोलापूर–तुळजापूर–धाराशिव रेल्वे मार्गावरील तुळजापूर–धाराशिव मार्गाची निविदा मंजुर झाली असून, लवकरच या कामाला सुरुवात होणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. ४१ किलोमीटरहून जास्त लांबीच्या या रेल्वे मार्गासाठी ४८७ कोटी रुपये खर्च प्रस्तावित आहे. रेल्वेमार्गामुळे धाराशिव स्थानक जंक्शन होणार असून, श्री क्षेत्र तूळजापूर रेल्वेनं जोडल्या गेल्यानं या भागात पर्यटनासह रोजगाराला चालना मिळणार आहे.

****

भारत आणि झिम्बाब्वे दरम्यान हरारे इथं झालेल्या पहिल्या टी – ट्वेंटी क्रिकेट सामन्यात भारताला १३ धावांनी पराभव पत्करावा लागला. प्रथम फलंदाजी करत झिम्बाब्वेच्या संघानं निर्धारित षटकात नऊ बाद ११५ धावा केल्या. रवि बिश्नोईने चार, वॉशिंग्टन सुंदरने दोन, तर मुकेश कुमारनं एक गडी बाद केला. प्रत्यूत्तरात आलेला आलेला भारताचा संघ विसाव्या षटकात १०२ धावांवर सर्वबाद झाला. शुभमन गीलने ३१, वॉशिंग्टन सुंदरने २७, तर अवेश खाननं १६ धावा केल्या. तीन सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज खेळला जाणार आहे.

****

महाकवी कालिदास दिनानिमित्त काल छत्रपती संभाजीनगर इथं साहित्य, संगीत, कला मंच या संस्थेच्या वतीनं, आषाढस्य प्रथम दिवसे हा गायन आणि कविता वाचनाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात पावसावर आधारित कवितांचं वाचन आणि गायनाचा सुरेख मिलाफ रसिकांनी अनुभवला. गायक विश्वनाथ दाशरथे, वैशाली कुर्तडीकर यांनी गायन, तर हर्षवर्धन दीक्षित, अश्विनी दाशरथे, वृषाली देशपांडे यांनी कवितांचं वाचन केलं.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या कन्नड तालुक्यात धुळे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर फतियाबाद इथं कारने ट्रकला मागून धडक दिल्यानं झालेल्या भिषण अपघातात तीन जण ठार तर दोन जण गंभीर जखमी झाले. काल पहाटे हा अपघात झाला. मृत उचित कुटुंबिय वाळूज इथले रहिवासी होते. जखमींवर छत्रपती संभाजीनगर इथल्या घाटी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

****

जालना शहरात काल १६ केंद्रावर कोतवाल भरतीची लेखी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेदरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, याकरता परीक्षा हॉलचं वेबकास्टींगव्दारे चित्रीकरण करण्यात आलं.

****

परभणी जिल्ह्याच्या गंगाखेड तालुक्यातल्या महातपुरी मंडळात झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे परिसरातल्या काही गावांत शेतीचं मोठं नुकसान झालं आहे. या नुकसानीची आमदार रत्नाकर गुट्टे यांनी पाहणी केली असून, शेतकऱ्यांनीकडून नुकसान भरपाईची मागणी होत आहे.

****

धनगर समाजाचा अनुसूचित जाती – एसटी प्रवर्गात समावेश करून स्वतंत्र आरक्षण देण्यात यावं, या मागणीसाठी बीड जिल्ह्यातल्या केज तालुक्यातल्या केकत सारणी इथं काही तरुणांनी आगळंवेगळं आंदोलन पुकारलं आहे. हे तरुण गावातल्या पाण्याच्या टाकीवर उपोषणाला बसले असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

बीड जिल्ह्यात गेवराई तालुक्यातल्या आहेर वडगाव शिवारात महसूल विभागाने जप्त करुन ठेवलेला १२० ब्रास वाळू साठा अज्ञाताने चोरून नेला. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

फॉरेक्स मार्केटमध्ये गुंतवणूक करून त्यात जास्त नफा देण्याचं आमिष दाखवून बीडमधल्या एका डॉक्टरची ५७ लाख २० हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाली आहे. याप्रकरणी सायबर पोलिसांनी तपास करून बिहारमधल्या पाच जणांना अटक केली आहे.

****